# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर　　**P.S.**(ठाणे): हुपरी

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0049　　**Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):20/02/2024 03:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 30/01/2024
**Date To** ( दिनांक पर्यंत): 19/02/2024
**Time From** (वेळेपासून): 17:14 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 19:27 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 20/02/2024　　**Time** (वेळ): 03:03 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 008

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 20/02/2024 03:03 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 1 किमी　　**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): भगवा रक्षक संघटना, बागडे गल्ली,हुपरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती राजश्री नंदकुमार तराळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भगवा रक्षक संघटना, बागडे गल्ली,हुपरी,हातकणंगले,हुपरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | भगवा रक्षक संघटना, बागडे गल्ली,हुपरी,हातकणंगले,हुपरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप योसेफ तिवडे | | | 1. प्लट न5,अपल सरस्वती हास्पीटल जवळ,पुण्य पर्व हौसिंग सोसायटी, ,कदमवाडी कोल्हापुर,करवीर,शाहुपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराच्या एकुण 18भारतीय चलनी नोटा | 9,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 20/02/2024

मी श्रीमती राजश्री नंदकुमार तराळे, वय - 50 वर्षे, व्यवसाय - भाजीपाला विक्री, रा. भगवा रक्षक संघटना, बागडे गल्ली, हुपरी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर मो.नं.8999426647 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनांक 29/01/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, आमचे शेजारी राहणा-या महिला संध्याराणी कोळी यांचेबरोबर आमचे पाळीव कुत्रे चावल्याचे कारणावरून दिनांक 25/01/2024 रोजी एकमेकांबरोबर भांडण झाले होते त्याबाबत आम्ही एकमेकांवर हुपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला असुन सदरचा गुन्हा नंबर 29/2024 भा.द.वि.स.कलम 289,509,323,504,34 प्रमाणे असुन माझेवर व मुलगा संतोष तराळे वय - 26 वर्षे यांचेवर गुन्हा दाखल आहे. सदर दाखल गुन्हयाचा तपास हुपरी पोलीस ठाणेचे दिलीप तिवडे साहेब हे करीत आहेत. दिनांक 26/01/2024 रोजी सकाळी 09.00 वा चे सुमारास हुपरी पोलीस ठाणेचे तिवडे साहेब हे माझे घरी आले व त्यांनी मला आमचेवर दाखल असले गुन्हयाचेकामी हुपरी पोलीस ठाणे येथे सकाळी 11.00 वाजता येणेस सांगितले. त्याप्रमाणे आम्ही त्यांना हुपरी पोलीस ठाणेत जावुन भेटलो असता तिवडे साहेब यांनी आमचेवर दाखल असलेल्या गुन्हयात आम्हाला अटक न करणेसाठी व गुन्हयात मदत करतो असे सांगुन त्यांना 10,000/-रू.दयावे लागतील अशी माझेकडे मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगून तेथून निघून आलो होतो. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 30/01/2024 रोजी तिवडे साहेब यांना हुपरी पोलीस ठाणे येथे भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी साळंुके साहेबांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. दिनांक 30/01/2024 रोजी पासुन मी व साळुंके साहेब फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. सांळुके साहेब यांनी ते हुपरी गावाजवळ आल्याचे सांगुन त्यांनी मला ते थांबलेले ठिकाणी बोलाविले त्यावेळी मी व माझा मुलगा संतोष तराळे असे साळुंके साहेब यांना जावुन भेटलो. त्यांना घेवुन मी माहेर हाॅस्पीटल जवळ हुपरी ते रेंदाळ जाणारे रोडलगत घेवुन आलो. त्यावेळी तेथे साळुंके साहेबांनी आम्हाला शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकाॅर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन हुपरी पोलीस ठाण्यातील पोलीस दिलीप तिवडे यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला, मुलगा संतोष व पंच न.1 यांना आमचेकडील मोटर सायकल होंडा शाईन एम.एच.एफ.यु.2155 वरून हुपरी पोलीस ठाणे येथे पाठवुन दिले आम्ही व पंच हुपरी पोलीस ठाणे येथे आलो. तेथे आम्ही पोलीस तिवडे साहेब यांना भेटलो त्यावेळी आमचेत आमचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी तिवडे साहेब यांनी मला किती आणले असे विचारून विषय झाला होता की असे म्हणुन बंदोबस्ताचे गडबडीत असुन घरी येवुन भेटतो असे म्हणालेने आम्ही तेथुन निघुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. तिवडे साहेब हे घरी येवुन आम्हाला भेटणार असलेने साळुंके साहेबांनी परत

आम्हाला योग्य त्या सुचना देवुन मला, मुलगा संतोष व पंच यांना आमचे घरी पाठवुन दिले सदर ठिकाणी आम्ही बराच वेळ तिवडे साहेबांची वाट पाहीले परंतु ते आले नाहीत म्हणुन त्यांना माझा मुलगा संतोष याने त्याचे मो.नं. 8999426647 वरून तिवडे यांचे मो.नं.9823118043 वरती फोन केला असता त्यांनी ते बंदोबस्तात असुन नंतर येवुन भेटतो असे सांगितले त्यांची ब-याच वेळ वाट पाहीले परंतु ते आले नाहीत त्यानंतर आम्ही सर्वजन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. पोलीस तिवडे हे बंदोबस्तात असलेने त्यांची भेट होणार नसलेने चालु कारवाई साळुंके साहेबांनी थांबवुन पुढील कारवाई दि.31/01/2024 रोजी करणेचे सांगितले.

दिनांक 31/01/2024 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास साळुंके साहेब थांबलेल्या बिरदेव मंदिराजवळ रेंदाळे या ठिकाणी आलो. त्यावेळी साळुंके साहेबांनी पोलीस तिवडे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने आणखीन पडताळणी करणेकरीता आवश्यक सुचना देवुन पोलीस तिवडे यांची भेट घेणेकरीता मला मुलगा संतोष व पंच नं. 1 यांना पाठविले. मी पोलीस ठाणेत जावुन तिवडे साहेब यांना भेटलो. त्यावेळी आमचेत आमचेवर दाखल असले गुन्हयाबाबत चर्चा झाली त्यावेळी मी त्यांना त्यात काहीतरी कमी करा मला यातुन पार पाडायच आहेअसे म्हणालो. त्यावेळी तिवडे यांनी काय कमी करणार मावंशी काय तरी बडबडु नका बर ठिक आहे काय बडबडु नका चला असे म्हणाले त्यावेळी मी किती करणार कमी करा बस असे म्हणुन बाहेर भेटा घरी येवु नका शक पकडत्यात असे म्हणालो त्यावेळी तिवडे यांनी मला जाणेस सांगीतले. त्यानंतर मी त्यांना घरी येणार काय या बाबत विचारले त्यावेळी तिवडे यांनी हु जावा असे सांगीतले त्यानंतर आम्ही सर्वजन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. पोलीस तिवडे हे घरी येण्यास हो म्हणालेने पोलीस तिवडे साहेब यांना फोन करून त्यांनी पुर्वी मागणी केलेल्या पैश्याची जुळना केली आहे पाच हजाराची असे सांगत असताना पोलीस दिलीप तिवडे यांनी फोन कट केला. थोडयावेळाने फोन केला असता फोन उचलला नाही त्यामुळे साळुंके साहेबांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगीत केली पोलीस तिवडे हे मला ज्यावेळी पुन्हा फोन करतील त्यावेळी पुढील कारवाई करण्याचे सांगितले.

दिनांक 18/02/2024 रोजी मी सांळुके साहेबांना फोन करून पोलीस तिवडे साहेब हे घरी आले होते व त्यांनी दिनांक 19/02/2024 रोजी त्यांना दहा हजार रूपये दयावे लागतील असे सांगुन निघुन गेल्याचे सांगितले. त्यावेळी सांळुके साहेबांनी ते पुर्वी थांबलेल्या ठिकाणी 19/02/2024 रोजी येत असल्याचे कळविले.

दिनांक 19/02/2024 रोजी सकाळी 12.00 वा चे सुमारास साळुंके साहेब थांबलेल्या बिरदेव मंदिर रेंदाळ या ठिकाणी आलो. त्यावेळी साळुंके साहेबांनी पोलीस तिवडे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने आणखीन पडताळणी करणेकरीता आवश्यक सुचना दिल्या त्यावेळी मी वरील मोबाईल नंबर वरून तिवडे साहेब यांना फोन केला त्यावेळी तिवडे यांनी ते शिवजयंती बंदोबस्तात असुन संपला की येतो असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा फोन लावला असता त्यांनी ते कार्यक्रमात असुन फोन करतो असे म्हणाले. त्यानंतर दोन बेळा त्यांना फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर तिवडे यांचा फोन आला परंतु तो मी उचलला नाही त्यानंतर मी पुन्हा त्यांना फोन केला त्यावेळी तिवडे यांनी मला कुठे आहे ते घरापशी आल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना भाजी घ्यायला आलो आहे... आलोच मी आलो थांबा... असे म्हणाले. त्यानंतर मी, मुलगा संतोष व पंच नं.1 असे आमचे घराजवळ गेलो तेथुन तिवडे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी आलोच असे म्हणाले. त्यानंतर काही वेळाने तिवडे साहेब घरात आले. त्यावेळी आमचेत दाखल गुन्हयाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी तिवडे साहेब सगळ करतो सहकार्य... असे म्हणाले त्यावेळी मी बघा काल तर बोलेले तुम्ही दहा हजार त्यात काय तरी कमी करा... असे म्हणालो. त्यावेळी तिवडे बर ठिक आहे एक हजार कमी करा असे म्हणाले. त्यावेळी मुलगा संतोष म्हणजे नऊ हजार पाहिजे काय... असे म्हणाले त्यावेळी तिवडे नऊ हजार असे म्हणाले. त्यावेळी मी नऊ हजार काय तरी कमी करा ओ असे म्हणाले त्यावेळी तिवडे मला पण लई माणस हाईत मला सगळया गोष्टी करावे लागत्यात असे म्हणाले त्यावेळी मी एक तासात जोडणा करतो असे म्हणाले. त्यावेळी तिवडे एक तासाच्या आत करायच बरा का... आता मग लक्षात ठेवा मग... फोन करा मला असे म्हणुन ते तेथुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही सर्वजन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डरमध्ये झालेले रेकाॅर्डींग ऐकुन खात्री केली. त्यावेळी पोलीस तिवडे हे आमचेवर दाखल असले गुन्हयात आम्हाला अटक न करणेसाठी व गुन्हयात मदत करतो असे म्हणुन माझेकडे 10,000/- रूपये लाच मागणी करून तडजोडीअंती 9,000/- रूपयांची लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर लागलीच पोलीस तिवडे साहेब यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 9,000/- रूपयांच्या नोटांना अॅथ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझेकडे एका प्लॅस्टीक पिशवीतुन देण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व

सापळा पथकातील अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने साळुंके साहेब यांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेका ॅर्डर चालु करून ते माझेकडे दिले. त्यानंतर मी, मुलगा संतोष व पंच 1 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन आमचे घरी आलो. त्यावेळी आमचे पाठोपाठ साळुंके साहेब, पंच नं.2 व सापळा पथक आले. त्यावेळी मी तिवडे साहेबांना फोन करून घरी या असे सांगितले. काहीवेळाने तिवडे साहेब घरी आले त्यावेळी आमचेत पाळीव कुत्रा तसेच माझे अंडयाचे व्यवसायाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी मी आणल्यात पैसे असे म्हणाले तसेच मुलगा संतोष जुळणी झालीया घेवुन जावा...असे म्हणाला त्यावेळी तिवडे कशाला मग... दे मग दे पटदिशी मग... असे म्हणाले त्यावेळी मुलगा संतोष हा दे असे म्हणाला. त्यावेळी तिवडे किती आहेत असे म्हणाले त्यावेळी मी नऊ हजार आहेत असे म्हणालो. त्यावेळी मी पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच साळुंके साहेब तसेच सापळा पथकातील अंमलदार पंच नं.2 असे सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह पोलीस तिवडे यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही हुपरी पोलीस ठाणे येथे येवुन पुर्ण करण्यात आली. दरम्यान उप अधीक्षक नाळे साहेब अ ॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांनी भेट दिली.

तरी हुपरी पोलीस स्टेशन येथे माझेवर व माझा मुलगा संतोष तराळे याचेविरूध्द गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास हुपरी पोलीस ठाणेचे पोलीस दिलीप तिवडे यांचेकडे असुन त्यांनी सदर गुन्हयात मला व माझा मुलगा संतोष याला अटक न करणेसाठी तसेच गुन्हयात मदत करतो असे सांगुन माझेकडे 10,000/-रूपयांची अप्रामाणिकपणे मागणी करून तडजोडीअंती 9,000/- रूपयांची मागणी करून माझ्याकडुन त्यांनी बेकायदेशीरपणे 9,000/- रूपये लाच स्विकारताना अ ॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी दिलीप योसेफ तिवडे, वय - 52 वर्षे, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक हुपरी पोलीस ठाणे जि.कोल्हापूर रा. कदमवाडी,अ ॅपल सरस्वती हा ॅस्पीटल जवळ, पुण्य पर्व हौसिंग सोसायटी, प्लॅट नं.501, एच.आर.5, कोल्हापूर, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

prasad Dileep kolape

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): psi

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे आंमलदार हुपरी
पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ningappa Rangappa
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 11301000362NRCM770